# हिरवागार लिंगाणा

लेखक- विठ्ठल गोरे



# हिरवागार लिंगाणा

विठ्ठल गोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

लेखन - विठ्ठल गोरे , कल्याण.

8655336422

vithal.gore@gmail.com



विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई .साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे-

प्रकाशन - ई साहित्य प्रतिष्ठान
मुखपृष्ठ आणि संपादन : सचिन काकडे

www.esahity.com
esahity@gmail.com
eleventh floor, eternity
easterrn express highway
Thane, 400604

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे.तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

© esahity Pratishthan®2015

२०१५च्या सुरवातीलाच बऱ्याच वर्षांपासून मनात असलेल्या लिंगाणा प्रस्तरारोहणाच्या ईच्छेला पूर्णत्वास नेण्यास यशस्वी झालो होतो. २०१५ची अगदी हवी तशी सुरवात झाली होती. तदनंतर राजगड, हरिशचंद्रगड, दुर्ग-दुर्गेश्वर रायगड, दुर्ग-भंडारा, कावनई या व अशा काहीश्या मोजक्याच भटकंती माझ्या वाटेला आल्या. मागील २-३ महिन्यात तर आजिबातच फुरसत मिळेनाशी झाली. एखाद्या वन्यजीवाला पिंजऱ्यात जेरबंद केल्याप्रमाणे स्वत्वाचे अस्तित्व शोधण्याच्या या जीवन नामक स्पर्धेत असा काही गुरफटलो की काही केल्या पायातल्या भिंगरीला गति मात्र मिळेनाशी झाली. सतत काहीतरी चुकल्या-चुकल्यासारखे वाटत राहायचे. या सर्व दुष्टचक्रातून बाहेर पडणं काळाची गरज होऊन बसली होती. कामाची जबाबदारी एवढी वाढली होती की आठवड्यात एक रविवारदेखील असतो याची जाणीव मात्र आजिबात उरली नव्हती. सारं काही अनावर होऊ लागलं होतं. आता राहवेनाच म्हणून मग एका ईच्छापूर्तीतून निर्माण झालेल्या दुसऱ्या ईच्छेला पूर्ण करायचंच असं ठरवून टाकलं. नेहमीप्रमाणे माझ्या अगदी शेवटच्या मिनिटाच्या नियोजनाला हो म्हणेल त्याला सोबत घेऊन ही भटकंती पूर्ण करण्याचं ठरवलं.

" नवा भिडू नवी खाज " या माझ्या उक्तीला जगणारा जयदिप दौंडकर(फोरेन रिटन) हा एकमेव साथीदार मी निवडला. अगदीच पाणी डोक्यावरून जात असताना म्हणजेच मी मुंबईतून निघालो असताना आमचा यी. आर.(ते काय असतं तेलाच इचारा) सुमित जगताप यांना 'येणार का उद्या ?' असं म्हणूस्तोवर गडी 'हो' म्हणून मोकळा झाला. आता दुचाकीवर एकमेकांच्या बोकांडी यायला




नको म्हणून मग माझा चुलत भौ गणूला सोबतीला घेतलं. आमची चांडाळ चौकडी सह्याद्रीच्या एका नव्या रूपाला पाहण्यास सज्ज झाली. आधी हा उठला मग तो उठला असं करत सगळी ७वाजता धायरी फाट्याच्या पुढच्या अंगाला भेटली. गळाभेट घेऊन २-४ खमंग शिव्या देऊन दुचाकीला दामटवत सगळी निघालो ते वेल्ह्याच्या दिशेनं. पावसाची शक्यता आजिबात नव्हती पण पाबे घाटमाथा गाठल्यावर निसर्गाने आपला रंग बदलला आणि सारं काही धूसर दिसू लागलं. छायाचित्रोग्राफीचा नवा-जुना नाद लागल्यानं डोकं जरा त्या कलेनंदेखील विचार करू लागलं. वेल्ह्यात न्याहारी करून मग तोरण्याच्या मागच्या बाजूनं भट्टी गाव गाठलं. तिथून दिसणारं तोरण्याचं रूप मनात तसेच क्यामेरात साठवून पुढं निघालो. केळद घाट चढून मुख्य रस्ता डाव्या बाजूला सोडून आता

आम्ही लाल मातीच्या व मुरमाच्या कच्च्या रस्त्याला लागलो होतो. वातावरण आमच्यावर जरा जास्तच मेहेरबान होतं असं म्हणायला हरकत नाही. समोर दिसणारं पावसाळ्यातील ते सह्याद्रीचं अतीव सुंदर मनमोहक रूप या दोन डोळ्यांच्यात सामाऊन घेणं केवळ अशक्यप्राय गोष्ट.



पांढऱ्याशुभ्र दुधाळलेल्या ढगांमुळे सह्यपर्वतरांगामध्ये जणू काही ज्वलंतता निर्माण केली होती. त्या सगळ्यांमध्ये लिंगाणा आपलं एक वेगळं रांगडं अस्तित्व जपत अचलपणे उभा होता. भटक्यांच प्रेरणास्त्रोत असलेला गडांचा राजा रायगड लिंगाण्यासमोर जणू त्यावर पाहारा ठेवत उभा होता. जगदिश्वर मंदिर ढंगामध्ये झाकलं गेलं होतं. आसपासच्या परिसरातून वाहणारे लहान-सहान धबधबे, ओढे तिथं पावसामुळं पसरलेल्या हिरव्यागार गालिच्याला आणखीन सुंदर दिसण्यास कारणीभूत ठरत होते. आता कधी एकदा मोहरी गाव गाठून रायलिंग्यावरून त्या अजस्त्र, महाकाय सुळक्याचे पावसाळी रूप पाहिन असं झालं होतं. पावसामुळं रस्ता चिखलानं बरबरटलेला होता.





त्यातून आपलं दुचाकी चालवण्याच कौशल्य दाखवत आम्ही जरा जपूनच पुढं जात होतो. आता सिंगापूर व मोहरी अशा दोन गांवाना जोडणाऱ्या रस्त्याच्या शेवटाला आम्ही आलो तेवढ्यात

पावसाने आम्हाला चांगलाच तडाखा दिला. गाड्या पुढं घेऊन जाण्याच वेडं धाडस न करता त्या तिथच सोडून मुळ उद्देश्य पूर्ण करण्याचा ठराव बिनविरोध मान्य झाला. मोहरी गावात सोबतची गोठोडी ठेऊन मग रायलिंग्यापर्यंतचा प्रवास सूरू झाला.






सह्याद्रीच्या एका दुर्गम भागात वसलेले मोहरी गाव नावासारखंच एक छोटेखानी फार कमी वस्ती असलेले गाव आहे. आजकालच्या ग्रामीण विकास योजनांच्या अखत्यारितून पूर्णपणे विलुप्त असलेल्या या गावाला साध्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी लागणारी साधनंदेखील नाहीत. निसर्गाची अलौकिक देणगी लाभलेल्या या गावच्या आसपासचा प्रदेश सह्याद्रीच्या कुशीतील एक मनमोहक असा प्रदेश आहे. आम्ही सर्व लिंगाण्याच्या दिशेने कूच करू लागलो. हा भाग ओबडथदोबड दगडधोंड्यांनी व्यापलेला आहे.

मोहरी गाव मुळातच एका विशिष्ठ उंचीवर असल्या कारणाने रायलिंग्याकडे जाताना चढ-उताराची शाळा पार करावी लागते. मध्यातच पावसाने आम्हाला तडाखा दिला. अचानक मोसमात बदल घडून येऊन एखाद्या मुलाला त्याच्या आईने झाडूने बडवावा तसं आम्हाला या पावसाने बडवून काढले. पावसामुळे पुढे असणारी वाट अगदीच धुसर होऊन बसली. अक्षरश: बाजूला चालणारा मनुष्यदेखील



दिसेनासा झाला. पाऊस काळात मुळातच या भागात कुणी चिटपाखरूदेखील भटकत नसल्या कारणाने एरव्ही राबती असणारी पाऊलवाट तिच्यावर वाढलेल्या गवतामुळे नाहीशी झाली होती. भटकंतीच्या नियमाप्रमाणे वाट दिसत नसेल तर



योग्य दिशेचा मागोवा घेत आपण आपला पुढील मार्ग ठरवायचा असतो. तसंच केलं. पावसाच्या बाधेमुळे मुख्य रस्त्यापासून थोडं खालच्या बाजूला आल्यानं जरा गडबडल्यासारखं झालं.



थोडी उसंत घेतली तेव्हा जरा कुठे समोरिल चित्र स्पष्ट झाले. उजव्या बाजूच्या एका धुसर वाटेने पुढे जात अखेर रायलिंग पठाराच्या वाटेला लागलो. मनात शंकेची एकच राल चुकचुकत होती की, "आपण इथं आलोय खरं पण जर निसर्गाच्या पाऊस पाण्याच्या या खेळाने विश्रांती नाही घेतली तर. ?" तर मग ज्या रांगड्या लिंगाण्याच्या दर्शनासाठी मी आलोय त्याचं दर्शन मला घडणारच नाही. मनात विविध विचारांचं चक्र सूरू झालं. रायलिंग पठाराचा लिंगाण्याकडील भाग आता थोडाफार दिसायला लागला होता. काही क्षणातच आम्ही रायलिंग पठारावर दाखल झालो.

आता मात्र मनात एकच प्रबळ ईच्छा उरली होती की हे सारे ढग बाजूला सरून पावसामुळे काळ्या-कभिन्न बसाल्ट दगडांनी बनलेला रांगडा लिंगाणा एका नव्या अवतारात दिसावा. पाऊस तसा झिमझिम चालूच होता. समोर पांढऱ्याशुभ्र पिंजलेल्या कापसांप्रमाणे भासणाऱ्या ढगांशिवाय काहीच दिसत नव्हते. पण वातावरणात फार कमी वेळात होणाऱ्या बदलांबाबत आम्ही

‘जाणते होतो, त्यामुळे एकटक समोरिल बाजूस बघत उभे राहिलो. हळूहळू निसर्गचक्र फिरू लागले आणि वातावरण बदलण्यास सूरवात झाली. सभोवतालच्या डोंगररांगा धुसरपणे डोळ्यांसमोर दिसू लागल्या होत्या. मनात आनंदाची लहरच जणू उभारून आली होती. अतिशय हळूवारपणे त्या सुळक्यावरून दुधाळलेल्या ढंगांची साय बाजूला सरकत गेली. चातकाला पाणी दिसल्यावर होणाऱ्या आनंदापेक्षा जास्त आनंद मला लिंगाण्याच्या दर्शनाने आधीही व्हायचा व आत्तादेखील होतो. ढग हळू-हळू बाजूला सरकत गेले आणि समोर उभा ठाकला माझ्या मनात कायमच घर करून



बसलेला सह्याद्रीच्या पर्वतरांगांतील आसमंताला भिडणारा एक उत्तुंग, अजस्त्र, बेलाग सुळका 'लिंगाणा'. आहाहाहाहा!!!! मनाला प्रसन्न करणारा हिरवागार रंग लिंगाण्याने पांघरून घेतल्याने त्याच्या शरीराची शोभा दसपटीनं वाढली होती. नजरेत न मावणारं ते त्याचं सौंदर्य मनातल्या तसेच सोबत आणलेल्या क्यामिरामध्ये साठवून ठेवण्यासाठी सुम्याची व माझी कसरत सूरू झाली. वातावरणीय बदलांना लक्षात घेता कमीत कमी वेळेत जास्तीत जास्त प्रमाणात लिंगाण्याच ते रूप क्यामेरात साठवून घेण्याची लगबघ सुरु झाली. पठारावर


गवत मोठ्या प्रमाणात वाढलं होतं. जो काही कातळ मोकळा दिसत होता तो अगदी घसरडा झाला होता. आता दुर्ग दुर्गेश्वराच्या अंगाखांद्यावर खेळणारा पांढराशुभ्र ढगांचा पुंजका बाजूला सरला होता. फक्त जगदिश्वराच्या मंदिरावर मात्र ते ढग अजूनही गर्दी करून होते. जशी रायगडाहून लिंगाणा दर्शनाची ओढ लागते अगदी तशीच किंबहुना त्यापेक्षा जास्त रायलिंगहून रायगड बघण्याची ओढ लागते. इथून दिसणारा रायगडाचा डेरा पाहून तो किती भव्य आहे याची कल्पना येते. आता पाऊस पूर्णपणे थांबला होता. ढगांच्या निरनिराळ्या आक्रुत्या मनाला थक्क करून सोडत होत्या. आम्ही ४ टाळकी लिंगाणा दर्शनाने अगदी आनंदित झालो होतो. नवीन नवक्यांच्या शेल्फीग्रीफीला अगदी ऊत आला होता. आजकाल लोक एखादा क्षण कशा प्रकारे अनुभवला त्याची आठवण म्हणून नाही तर मी हा फोटो थोबाडपुस्तिकेवर अपलोड करून कसा बर जास्तीत जास्त लायक्स मिळवता येतील यासाठी फोटो काढतात. असो.



आता लिंगाण्याबद्दल सांगायच झालं तर शिवकाळातील कैद्यांच्या मनाचा थरकाप उडवणारं ते अतिभयानक तुरूंग होतं. ३ साडे तीन हजार फुटांचा हा गगनभेदी सुळका पाहताच बऱ्याच जणांच्या मनात धडकी भरत असे. कैद्यांना ठेवण्यासाठीचे अगदी सुरक्षित ठिकाण म्हणून लिंगाण्याची ओळख कायम होती. आजही सह्याद्री पर्वतरांगांतील एक अफाट, बेलाग, कठीण श्रेणीतील सुळका म्हणून लिंगाण्याची ओळख कायम आहे.



स्वत: ला भटक्या म्हणवणाऱ्या प्रत्येकाच्या यादीत लिंगाण्याचे नाव सर्वात वरच्या ठिकाणी असते. अलंग, मदन, कुलंग व लिंगाणा ह्या दोन भटकंती सह्याद्रीतील





सर्वात खडतर प्रकारच्या मानल्या जाणाऱ्या भटकंती आहेत. आजही कित्येक जण लिंगाणा पादाक्रांत करण्याची स्वप्ने घेऊन झोपत आहेत. या किल्ल्याची भौगोलिक परिस्थितीदेखील अगदी महत्वाची आहे. मागच्या बाजूला राजगड-तोरणा, उजव्या बाजूला कोकणदिवा, निसाणाची वाट, समोरच्या बाजूला दुर्गराज रायगड, डाव्या बाजूने सूरू होणारं जावळीचं जंगल अशा सगळ्यांच्या मध्यस्थानी लिंगाणा अगदी दिमाखात उभा आहे. इंग्रजांच्या दुर्गविध्वंसाच्या तडाख्यातून लिंगाणादेखील वाचला नाही.

त्यावर तोफा डागून त्याच्या दुर्गमतेला आणखी दुर्गम बनवण्याच काम त्यांनी केलं. गडावर जाताना प्रस्तरारोहण करूनच वर जावे लागते. वर चढताना लक्षात येतं की फारच कमी कातळ कोरीव पायऱ्या तिथे शिल्लक आहेत. अतिशय सावधपणे आपल्याला आपलं प्रत्येक पाऊल पुढे टाकावं लागतं. पण या सर्व अडथळ्यांना दूर पार करत तुम्ही जेव्हा त्याच्या माथ्यावर पोहोचता. तेव्हा होणारा आनंद शब्दात मांडणे कठीणच ते प्रत्यक्षातच अनुभवाव.

हळू हळू वेळ पुढे सरकत होता. भूक तशी नव्हती म्हणा कारण समोरील खाद्याने आमची भूक पूरती मिटवसी होती. तरीही सोबत आणलेले पदार्थ तिथेच बसून हादडले. आता पुन्हा पावसाची चिन्ह दिसू लागली होती. आवरतं घेतलं आणि त्या अजस्त्र लिंगाण्याकडं पुन्हा पाहिलं आणि मनातल्या मनात म्हंटलं, " येतो रे बाबा काही दिवसातच तोवर काळजी घे स्वत:ची". भावूक होणं स्वाभाविकच आहे. ज्याप्रमाणे आपण लिंगाण्यावर जीवापाड प्रेम करतो त्याप्रमाणे तोदेखील आपल्यावर प्रेम  करत असेलच की. असं म्हणून परतीच्या वाटेला लागलो. नेहमीप्रमाणे सह्याद्रीने माझ्या झोळीत नव्या आठवणी व नव्या अनुभवांची शिदोरी घातली. अचल, स्थिर, शांत, खंबीर, सजग हे सर्व गुण अंगिकारलेला सह्याद्री अगदी निस्तब्धपणे आपल्याला काहीतरी सांगण्याचा प्रयत्न करत असतो. त्याची आत्मीयता समजून घेण्याचा कधी प्रयत्न करून बघा. शांत डोक्याने विचाराधीनपणे वागल्यास बऱ्याच कठीण गोष्टींचा सामना आपण सहजतेने करू शकतो. सह्याद्रीत फिरताना या गोष्टीचा पुरेपुरपणे अनुभव आपल्याला येतो. एखाद्या आडवाटेने फिरताना किंवा एखादा दुर्गम सुळका पार करताना अविचारीपणाने किंवा मग केवळ घाई केल्याने कित्येकदा जीवघेण्या समस्यांना तोंड द्यावे लागले आहे. कसंय की जेव्हा मनुष्य परिस्थितीचे भान न राखता केवळ परिणामांकडे लक्ष द्यायला जातो तेव्हा तो स्वत:चेच नुकसान करून

घेतो. सह्याद्रीत फिरतानादेखील हाच नियम लागू होतो. सह्याद्रीएवढा उत्तम शिक्षक शोधूनदेखील सापडायचा नाही. समजून घेण्याची, अंगवळणी पाडून घेण्याची दानत असली की मग एखाद्या अचल कातळाकडूनदेखील कोणत्याही परिस्थितीत आपली जागा लावून धरण्याचा गुण आपल्याला आत्मसाद करता येतो. ईच्छा तेथे मार्ग या उक्तीप्रमाणे सह्याद्री आपल्याला हेच शिकवतो की एखादी घाटवाट, गडवाट अगदी कितीही अनवट, अवघड असली तरीही त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग आपल्याला शांत चित्ताने विचार करूनच शोधता येतो. सह्याद्री आपल्या परीने खूप काही सांगत, शिकवत असतो, फक्त ते समजून घेण्याचा दृष्टिकोन असायला हवा.



# ई साहित्य प्रतिष्ठान

कुठलीही भाषा चांगली किंवा वाईट नसते. आपली भाषा ती आपली भाषा. जशी दोन मातांची तुलना करता येत नाही तशी दोन मातृभाषांचीही करू नये. आपण आपली भाषा समृद्ध करण्यासाठी काय करता येईल ते करावे. बस्स.

तर तसे अनेक चांगले मराठी लोक चांगलं काही करायचा प्रयत्न करत असतात. काही चांगले लोक चांगलं मराठी लिहायचा प्रयत्न करत असतात. आणि हे चांगलं जास्तीत जास्त मराठी लोकांपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न आम्ही करतो. दर महिन्याला डझन अर्धा डझन पुस्तकं प्रकाशित करतो. ती सुमारे तीन लाख  वाचकांपर्यंत पोहोचवतो. आजवर हजाराच्या घरात पुस्तकं प्रकाशित केली आहेत.

यावर खुष व्हावं. अजिबात नाही.

बारा कोटी लोकांची भाषा मराठी. त्यातले निदान सहा कोटी साक्षर.

आणि वाचक किती? तीन लाख?

बहुत नाइन्साफ़ी है.

मराठीतला प्रत्येक साक्षर वाचक व्हायला हवा. मोबाईलचा वाढता प्रसार आणि इंटरनेटचा वाढता व्याप पहाता, हे शक्य आहे. होय. हे शक्य आहे.

मराठी ई बुक्स चे वाचक कोटीच्या संख्येत असायला हवेत.

हे कोण करणार?

तुम्ही!

तुम्ही आपल्या ओळखीच्या  किमान दहा लोकांचे ई मेल पत्ते आम्हाला द्या. त्यांना वाचक बनवण्यासाठी आम्ही जंग जंग पछाडू. ते शंभर लोकांना वाचक बनवतील. लाखांचे कोटी व्हायला कितीसा वेळ लागणार?

सर्व प्रकारच्या वाचकांसाठी आम्ही पुस्तकं बनवतो. बालसाहित्यापासून ते गूढ कथांपर्यंत आणि ज्ञानदेव तुकारामांच्या संत साहित्यापासून ते अगदी कामसूत्रापर्यंत. प्रत्येक तऱ्हेच्या वयाच्या, निवडीच्या, आवडीच्या वाचकासाठी आम्ही पुस्तकं बनवतो आहोत. अगदी कृषी आणि रेसिपी सुद्धा.

मित्रांनो. या अभिनव अभियानात सामिल व्हा.
दहा लोकांना वाचक बनवा.
दहा साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला कळवा.

असे ई मेल आय डी पाठवणा-या वाचकांना आम्ही **VIP** वाचक दर्जा देतो. .

आमचा पत्ता :esahity@gmail.com
अधिक माहितीसाठी भेट द्या :www.esahity.com

आपले नम्र
टीम ई साहित्य प्रतिष्ठान

दुर्ग दुर्घट भारी

हिरवागार लिंगाणा